**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** गडहिंग्लज
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0468 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/07/2025 09:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 05/07/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/07/2025
**Time From (वेळेपासून):** 11:47 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/07/2025 **Time (वेळ):** 07:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 011
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/07/2025 08:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** गडहिंग्लज पोलीस ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कविता विजय अकुला
(b) **Husband's Name** (पती चे नाव) : विजय अकुला
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 9-1633वायएसआर कलनी,संगारेइडी, तेलंगना ,RANGAREDDY, तेलंगाना,भारत |
| 2 | स्थायी पता | 9-1633वायएसआर कलनी,संगारेइडी, तेलंगना ,RANGAREDDY, तेलंगाना,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9966977464

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निता शिवाजी कांबळे | | पती का नाम : शिवाजी कांबळे | 1. केडीसी बंक कलनी 56/57 डावी ब,गडहिंग्लज ,गडहिंग्लज, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 06/07/2025

मी कविता विजय अकुला वय 49 वर्षे व्यवसाय - हाउस वाईफ ,रा.9.1633 वायएसआर कॉलनी, जिवो टॉवर जवळ आयडीए बोल्लेराम मंडल,जिला संगारेड्डी स्टेट तेलगंणा मो .नं 8688588585/9966977464 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की,

दिनांक 21/06/2025 रोजी माझा मुलगा विनयविर अकुला यांने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे पोर्टलवर ऑनलाईन लाच मगाणीबाबत तक्रार केली. त्यानंतर सदरच्या ऑनलाईन तक्रारी वरुन दि.26/06/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर येथील श्रीमती वैशणवी पाटील यांनी माझे मुलाचे मोबाईल नं. 8688887473 यावर फोन केला तेंव्हा त्याने आम्ही कोल्हापूरला येवून तक्रार देणार असल्याचे सांगितले त्यानुसार माझे मुलाने मला वैशणवी पाटील मॅडम यांचा 9764140777 हा नबंर दिला.त्यानंतर मी दिनांक 03/07/2025 रोजी पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांना माझे वरील मोबाईल नंबरवरुन फोन करून लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगून मी दि.4/7/2025 रोजी सायंकाळी मियॉपूर ,राज्य तेलंगणा येथून ट्रॅव्हल्स मधून निघून कोल्हापूर येथे दि.5/7/2025 रोजी सकाळी पोहचत असल्याचे सांगितले.त्याप्रमाणे दि. 05/07/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांचेकडील पोलीस निरीक्षक राजेंद्र सानप यांचेकडे माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत हिंदी मध्ये लेखी तक्रार दिली ती पुढीलप्रमाणे मै उपरोक्त पतेपर मेरे परिवार के साथ रहिती हु, हमारे पास मारुती सुझुकी इग्रीस कार नं. TS-08-HH-5718 यह कार है , तारीख 15/05/2025 के दिन सुबह 06.30 बजने के करीब मेरा लडका अपने परिवार के साथ हमारी कारसे महाराष्ट्र स्टेट के कोल्हापूर जिल्हे मे आजरा गडहिंग्लज रोडसे गिजवने गांवसे गुजर रहे थे. उसवक्त हमारी कारसे एक बुजुर्ग आदमी जो पैदल जा रहे थे उनको ठोकर लगी और कार बाजूके कठडेसे टुकरायी ○। उस रोड अँक्सीडेंट में मेरा लडका और परिवार के सदस्य जखमी हुये थे और पैदल जा रहे बुजुर्ग आदमी जखमी हुए थे उनको अँम्ब्युलन्स से अस्पताल ले जाया गया था उधर उनकी मौत हुई थी ○। उसके बाद बुजुर्ग आदमी के घर वालोने गडहिंग्लज पुलिस थाने मे इस रोड अँक्सीडेंट के बारे मे रिपोर्ट की थी और गडहिंग्लज पुलिस थाने मे मेरे लडके खिलाफ एफआयआर नं 338/2025, भारतीय न्याय संहिता सेक्षन 106 (1),125 (a), 125(b), 281, मोटरवाहन अधिनियम सेक्षन 184 के तहत मुकदमा दर्ज किया था ○। उस केस की इन्व्हेस्टिगेषन गडहिंग्लज पुलिस थाने की महिला असी.पुलीस सब इन्स्पेक्टर निता मॅडम कर रही है ○। उन्होने हमारी कार जप्त कर ली थी ○। तारीक 01/07/2025 के दिन मेरे मोबाईल नंबर पे निता मॅडम ने 9561445331 इस नंबरसे फोन किया था ○। तब मेरी उनसे केस के बारे मे चर्चा हुई थी ○। उसवक्त निता मॅडम ने हमारी कार हमे वासप देणे के लिए, एफ. आय.आर के सेक्षन कम करणे के लिए और एफ.आय.आर के कागजाद देणे के लिए कुलमिलाके 60,000 रू. रिष्वत की मांग की थी ○। तारीक 01/07/2025 के दिन हम गडहिंग्लज पुलीस थाने में हमारी गाडी छुडवाने के लिए गये थे उस दिन सहा.पुलीस सब इन्स्पेक्टर निता मॅडम ने हमसे 2000 रू. लिये उसके बाद हमारी गाडी हमे वापस दी ○। उसके बाद तारीक 02/07/2025 से बारबार निता मॅडम मुझे फोन करके मेरे पास 60,000/रू की, मॉग कर रही है ○। असि.पुलीस सब इन्स्पेक्टर निता मॅडम जो रिष्वत मांग रहि है ,वह मुझे देणे की ख्वाईष नही है ○। निता मॅडम से मेरी कोई पुरानी दुष्मनी नहीं है ○। और हमारे बिचमें कोई भी लेन-देन का व्यवहार नही है ○। आपसे मेरी बिनती है की, आज मै निता मॅडमसे मिलने जा रही हु उन्होने मुझसे रिश्वत की मांग की तो निता मॅडम के उपर उचित कानुनी कारवाई करे या मजकुराची तक्रार त्यांना सांगितली. त्यानंतर पाटील मॅडम यांनी मला दिनांक 05/07/2025 रोजी सकाळी 06.30 वा पर्यंत षासकीय विश्रामगृह कोल्हापूर येथे येण्यास सांगितले तसेच सदर ठिकाणी त्यांचेकडील पोलीस निरीक्षक राजेंद्र सानप हे येवुन मलस भेटुन ते माझे तक्रारी प्रमाणे कारवाई करतील असे सांगितले. त्यानंतर मी व सानप साहेब फोनवरून संपर्कात होतो. मी दिनांक 05/07/2025 रोजी

सकाळी 06.30 वा चे सुमारास षासकीय विश्रामगृह कोल्हापूर येथे आले. काहीवेळात तेथे सानप साहेब व त्यांचा स्टाफ तेथे आले. त्यावेळी सानप साहेब यांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून दिली. त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर सानप साहेब यांनी पुढील कारवाई आपण गडहिंग्लज येथून जावून करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आपण कोल्हापूर येथून 09.30 वा निघून गडहिंग्लज येथे हॉटेल कोलकी लॉन्स येथे आजरा रोड 11.30 वाजता येथे आलो. त्यावेळी सानप साहेब यांनी कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन गडहिंग्लज पोलीस ठाणे येथील पोलीस निता कांबळे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना मला हिंदी मध्ये दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 11.47 वा चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 श्रीमती सुनिता नागणे यांना भेटणेकरीता पाठविले. मी गडहिंग्लज पोलीस स्टेषन येथे गेलो त्यावेळी तेथे मी पोलीस निता कांबळे यांचेबाबात माहिती घेतली असता त्या नाईट करुन घरी निघून गेल्याचे समजल्याने मी व पंच तेथून निघून सानप साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो त्यावेळी रेकॉर्डर 12.08 वा बंद केला. त्यानंतर मी त्यांना घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर सानप साहेब यांचे सुचनेवरुन मी माझे वरील मोबाईल वरुन पोलीस निता कांबळे यांचे मोबाईल नंबर 9561445331 वरती स्पीकर फोन ऑन करुन 12.17 वाजता फोन केला त्यावेळी निता कांबळे मॅडम यांनी फोन उचलला त्यावेळी मी त्यांना गडहिंग्लज येथे माझे गावावरुन आलेबाबत सांगितले. आमचेत माझा मुलगा विनयविर याचेवर गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे दाखल असले गुन्हयाचे अनुशंगाने तसेच गुन्हयात जप्त केलेल्या कारबाबत व इन्षुरन्साठी गुन्हयातील आवष्यक असणारी कागदपत्रे देण्याचे अनुशंगाने बोलणे झाले त्यावेळी मी "वही मॅडम पैसेके बारेमे " असे म्हणाले. त्यावेळी कांबळे मॅडम "हा" असे म्हणाल्या. त्यावेळी मी "उसमे मै उतना अँडजेस्टमेंट नही हुवा मॅडमजी.... " असे म्हणाले. त्यावळी कांबळे मॅडम " कितना हुवा है.." असे म्हणाल्या. त्यावेळी मी" आप उस दिन फिप्टी थाउंजन और टेन एस्क्ट्रा लेने को आयो बोलीथी ना... टेन एक्स्ट्रा टोटली सिक्स्टी थाउजन पुचेथे ना मॅडम... " असे म्हणालो. त्यावेळी कांबळे मॅडम "हां.." असे म्हणाल्या. त्यावेळी मी " चालीस हजार का इंन्तजाम हुवा.. " असे म्हणालो. त्यावेळी कांबळे मॅडम " चालीस हजार का... " असे म्हणाल्या. त्यावेळी मी " हां मॅडमजी " असे म्हणालो. त्यानंतर कांबळे मॅडम यांनी मला रिक्षा स्टॉपवर जावून तेथे रिक्षा चालकाला फोन दया त्याला मी माझे घराचा पत्ता सांगते त्याप्रमाणे तुम्ही माझे घरी या. असे आमचेत बोलणे झाले त्यानंतर मी सदरचा फोन 12.23 वाजता बंद केला. सदरचा फोन आपलेकडील व्हॉईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड केला. कांबळे मॅडम यांनी माझेकडे माझे मुलावर दाखल असलेल्या गुन्हयात कलम कमी करण्यासाठी तसेच गुन्हयात जप्त असलेली कार सोडली म्हणून, तसेच इन्श्युरन्सासाठी गुन्हयाची कागदपत्राच्या नकला मला देण्यासाठी, माझेकडे तडजोडीअंती 40,000/- रूपयांची लाच मागणी करुन सदरची लाच रक्कम घेवून त्यांचे घरी बोलविल्याचे पंचासमक्ष निष्पन्न झाले.

त्यानंतर सानप साहेब यांनी लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली तसेच सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यावेळी त्यांनी लाच रक्कम बाबत मला विचारणा केली, त्यावेळी मी त्यांना माझेकडे 10500/- रुपये असल्याचे सांगुन माझेकडील 500/- रूपये दराच्या 21 चलनी नोटा असे 10,500/- रूपये हजर केले. परंतु कांबळे मॅडम यांनी माझेकडे 40,000/- रूपयांची मागणी केली आहे. त्यामुळे त्यांना 40,000/- रूपये देणे आवष्यक असल्याने, सानप साहेब यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या 500/- रू असे लिहलेल्या चिल्डर्स बँक च्या लहान मुलाच्या खेळण्यातील 59 नोटा उपलब्ध केल्या. असे एकुण 40,000/- लाच रक्कम उपलब्ध झाली. सानप साहेब यांनी मला व पंचाना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अँथ्रासिन लावलेले 40,000/- रूपये माझे पर्समध्ये ठेवुन दिले. त्यानंतर पुन्हा सानप यांनी सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 12.56 वाजता सुरू करून तो पोहेकॉ/संगिता गावडे मॅडम यांनी माझे ड्रेसच्या आतमध्ये दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर मी व पंच नागणे मॅडम असे गडहिंग्लज स्टॅन्ड समोरुन, एका खाजगी रिक्षासमोर जावून कांबळे मॅडम यांना त्यांचे वरील फोनवर फोन करुन गडहिंग्लज रिक्षा स्टॅन्डवर आल्याचे सांगितले त्यावेळी त्यांनी फोन रिक्षा चालकाकडे देण्यास सांगितला. कांबळे मॅडम यांनी त्या रिक्षा चालकास त्यांचा पत्ता सांगून, आम्हाला त्यांचे घरी सोडणेस सांगितले, त्यानंतर आम्ही त्या रिक्षामध्ये बसून कांबळे मॅडम यांचे घराकडे जात असताना, सानप साहेब पंच नं.2 व त्यांचा स्टाफ हे आमचे रिक्षा पाठोपाठ आले.रिक्षा चालकाने आम्हाला एका कॉलनीत सोडले. त्यावेळी सानप साहेब व त्यांचे सोबतचे लोकही तेथे आले. आम्ही कॉलनीतील एका इसमास कांबळे मॅडम यांचे घराचा पत्ता विचारुन घेतला. त्यानंतर आम्ही कांबळे मॅडम यांचे घराजवळ गेलो.त्यावेळी सानप साहेब,सापळा पथक, पंच नं.2 चौगुले असे घराचे परिसरात सापळा लावुन थांबले. त्यावेळी मी व पंच नागणे असे कांबळे मॅडम यांचे घरामध्ये गेलो व त्यांचेषी बोलत असताना, त्यांची मुलगी त्यांचे

घरामध्ये आली व तीने कांबळे मॅडम यांना पंच नागणे यांचेकडे बोट करुन, हया मॅडम बाहेर कोणाला तरी इषारा करुन बोलत होत्या. त्या पोलीस घेवून आले असतील, असे म्हणाली, त्यावेळी कांबळे मॅडम यांनी ए.सी.बी चे लोक घेवून आला आहे का? असे बोलल्या. त्यावेळी मी त्यांना नाही असे म्हणालो. त्यानंतर कांबळे मॅडम हया मला मी एसीबी कडे तक्रार केली असेल, या अनुषंगाने त्या चाचपणी करत संषयाने माझेषी बोलत होत्या. त्यावेळी त्यांनी माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यानंतर त्यांनी मला त्या सायंकाळी पोलीस स्टेषन येथे येणार असून, त्यावेळी कागदपत्रांच्या नकला देतो. असे सांगुन, सायंकाळी पोलीस स्टेषन येथे येण्यास सांगितले त्यामुळे आम्ही सर्वजण परत पुर्वी थांबलेल्या ठिकाणी आलो व आमचे पाठोपाठ सानप साहेब व सापळा पथक तेथे आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर **13.54** वाजता बंद केला. त्यानंतर सानप साहेब यांना मी घडलेली हकीकत सांगितली.

त्यानंतर सानप साहेब यांनी मला सांगितले की, तुम्हाला कांबळे मॅडम यांनी सायंकाळी पोलीस स्टेषन येथे कागदपत्राच्या नकला देणेसाठी बोलविले असल्याने, पुन्हा सापळा कारवाई आयोजीत करुया व तसे करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर पुन्हा सानप साहेब यांचे सुचनेवरुन, मी माझे वरील फोनवरुन कांबळे मॅडम यांना तीन-चार वेळा फोन केला असता, त्यांना फोन लागला नाही. म्हणून मी माझेकडील दुसरा मो.नं**9966977464** नंबर वरुन कांबळे मॅडम यांना **15.55** वा.फोन केला असता, त्यांचे मुलीने फोन उचलून कांबळे मॅडम झोपल्या आहेत. त्या जागे झाल्यानंतर, फोन करतील असे मला सांगितले. सदरचा कॉल रेकॉर्ड केलेला आहे. त्यानंतर आम्ही कांबळे मॅडम यांची वाट पाहीली, परंतू कांबळे मॅडम यांचा फोन आला नाही. म्हणून त्या पोलीस स्टेषन येथे आल्या असण्याची षक्यता असल्याने, पुन्हा सापळा कारवाई आयोजीत करणेबाबत सानप साहेब यांनी सांगितले. त्याप्रमाणे साहेबांनी सापळा कारवाईच्या अनुशंगाने पुन्हा सुचना देवून **16.55** वा.मपोहेकॉ/गावडे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे ड्रेसच्या आत दो-याच्या सहायाने अडकवला, त्यानंतर वरील प्रमाणे लाच रक्कम घेवून मी व पंच नागणे असे आम्ही थांबलेल्या ठिकाणावून गडहिंग्लज पोलीस स्टेषन येथे गेलो. ते तेंव्हा सानप साहेब पंच नं.2, व सापळा पथक असे पोलीस स्टेषनचे आजूबाजूस येवून सापळा लावून थांबले. मी पोलीस स्टेषन येथे जावून ठाणे अंमलदार यांना भेटून, कांबळे मॅडम आल्या आहेत काय? या बाबत विचारणा केली असता, ठाणे अंमलदार यांनी त्या नाईट करुन गेल्या आहेत. असे सांगितले. त्यावेळी मी पुन्हा कांबळे मॅडम यांना फोन लावला असता त्यांचा फोन लागला नाही म्हणून, ठाणे अंमलदार यांचे मोबाईल वरुन कांबळे मॅडम यांना फोन करुन मी पोलीस स्टेषन येथे आले बाबत सांगितले. त्यावेळी ठाणे अंमलदार यांनी कांबळे मॅडम येत आहेत. असे मला सांगितले. त्यानंतर काही वेळाने कांबळे मॅडम पोलीस स्टेषन येथे आल्या त्यानंतर आमचेत आमचे कामाचे अनुशंगाने बोलणे झाले. त्यावेळी मी "आप यकीन मानना मॅडम देदु....".असे म्हणाले. त्यावेळी कांबळे मॅडम "कितना है ओ" असे विचारले. त्यावेळी मी "गिनलो आप गिनलो..". असे म्हणाले. त्यावेळी कांबळे मॅडम " नई नई नई गिनकर नही" अषा म्हणाल्या. कांबळे मॅडम यांना पहिल्या सापळा कारवाईवेळी माझा संषय आल्याने त्यांनी माझेकडून मागणी केलेले पैसे स्विकारले नव्हते म्हणून मी त्यांना मुददाम त्यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेपेक्षा जास्त रुपये आणलेत हे सांगणेसाठी "नही यहा पर आंदर जाकर गिन लो, फिप्टी लेके आई, पचास हजार लेके आई, पक्का पचास हजार रूपये है. ये लिखने के बाद दियाथा ना, ये क्या लिखना बोलो पहिले "असे म्हणाले त्यावर कांबळे मॅडम हया " ये पहिले दे दो ..."असे म्हणून माझेकडे लाचेच्या पैषांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना त्यांनी मागणी केलेली **40000/-** रुपये लाच रक्कम त्यांना माझे उजव्या हाताने दिली. त्यांनी ते पैसे उजव्या हाताने स्विकारुन, त्यांचे टेबलचे जवळ असले लोखंडी पेटीचे वरती असले ब्लॅकेट मध्ये ठेवले. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने चालु असताना, मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता, सानप साहेब त्यांचा स्टाफ व पंच तेथे आले. त्यावेळी स्टाफ मधील एका अंमलदाराने माझेकडील व्हाईस रेकॉर्डर **18.16** वाजता बंद केला. त्यानंतर सानप साहेब यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह कांबळे मॅडम यांना मपोहेकॉ/ गावडे यांचे मदतीने ताब्यात घेतले. त्यावेळी सानप साहेब यांनी कांबळे मॅडम यांचे हाताची व त्यांनी ज्या ठिकाणी पैसे ठेवले त्या ब्लॅकेटची पंचासमक्ष लाईट बंद करून अंधारात अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता, कांबळे मॅडम यांचे हातावर व ब्लॅकेट वरती फिकट हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून, पुढील सर्व कार्यवाही षासकीय विश्रामगृह,गडहिंग्लज जि. कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी माझे मुलावर गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे अपघाताचा गुन्हा दाखल असून, सदर गुन्हयातील कलम कमी करतो तसेच गुन्हयातील आमची कार सोडली म्हणून व इन्ष्युरन्ससाठी गुन्हयाचे कागदपत्राच्या नकला देणेसाठी गडहिंग्लज पोलीस ठाणे येथील महिला पोलीस निता कांबळे यांनी माझेकडे अप्रमाणीकपणे **40,000/-** रूपये मागणी केल्याचे निषन्न झाले. त्यानंतर मागणी केलेली लाच रक्कम **40,000/-** रूपये माझेकडुन बेकायदेशीरपणे स्विकारताना त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने, माझी निता षिवाजी कांबळे वय - 57 वर्षे,

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Name (नाव):** ajay janardan sindka

**Rank(पद):** PI (Inspector)

**No.(सं.):** PNMAH46135

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)